# अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचे प्रयोजन

प्रा. डॉ. सुशीलप्रकाश या. चिमोरे
मराठी विभागप्रमुख
श्री.हावगीस्वामी महाविद्यालय उदगीर,ता.उदगीर जि.लातूर

***प्रस्तुत*** लेखात अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याच्या प्रयोजनाचा विचार करावयाचा आहे. प्रयोजन या शब्दासाठी पर्यायी शब्द हेतू, उदिष्ट, साध्य, उद्देश असे वापरले जातात. प्रयोजन, कार्य आणि परिणाम या शब्दाचा अनेकदा एकत्र उपयोग केला जात असला तरी प्रयोजन अगोदर मनात निर्माण होते आणि नंतर कार्याची सुरुवात होते. विशिष्ट प्रयोजन डोळयासमोर असूनही त्याप्रमाणे कार्य घडेल असे नाही. त्यामुळेच परिणाम आणि प्रयोजन यात भेद करावा लागतो.एखादया वस्तूकडून साधले जाणारे कार्य म्हणजे त्या वस्तूचे प्रयोजन असते.कारण एखादया वस्तूची प्रक्रती ही त्या वस्तूचे प्रयोजन ठरवित असते.साहित्याची प्रक्रती नीट समजल्याशिवाय साहित्याचे प्रयोजन ठरवता येत नाही. साहित्याच्या प्रयोजनासंबधी प्राचीन, पाश्चात्य, आधुनिक अभ्यासकांनी विचार मांडले आहेत. साहित्य क्षेत्रात मम्मटांनी सांगितलेलली यश,अर्थ,उपदेश,व्यवहारज्ञान, अशुभनिवारण,आनंद ही प्रयोजने प्रमाणभूत मानली जातात.पाश्चात्य अभ्यासकांनी आत्माविष्कार,स्वप्नरंजन,पलायनवाद,उदबोधन,इच्छापुर्ती,जिज्ञासा पुर्ती इ.प्रयोजने सांगितली आहेत.अण्णा भाऊंच्या साहित्याचा अभ्यास करताना त्यांच्या साहित्याचे स्वरुप नीट समजून घेतल्याशिवाय त्यांच्या साहित्याचे प्रयोजने ठरविता येत नाहीत.अण्णाभाऊंचे साहित्य, उपेक्षित, गरीब,दारीद्रयात पिचत पडलेल्या परंतु जगण्यावर निष्ठा असणाऱ्या आशावादी माणसाचे जगणे आहे.उपेक्षित समाजावर होणाऱ्या अन्याय ,अत्याचार,जुलूम,जबरदस्ती,विस्थापित आणि प्रस्थापित यांच्यातील संघर्षात ही नीतीमूल्यांची प्रकाशमय ज्योत जपून ठेवून संस्कृतीचे रक्षण आणि पराक्रमी पुरुषांची देशनिष्ठा त्याचा स्वाभिमान,शीलवंत स्त्रीयांच्या जीवनाचे वास्तव अतिशय प्रमाणिकपणे अण्णा भाऊंनी साहित्यात चित्रित केले आहे. अण्णाभाऊ माणसासाठी लिहिणारे ,माणूस हे मूल्य साहित्य आणि जीवनात जपणारे माणूस प्रेमी लेखक होते.त्यांच्या साहित्य लेखनाचे प्रयोजन एक की,अनेक होते,याचा शोध या निबंधातून घ्यावयाचा आहे.

**१)यशप्राप्ती** ः हे मम्मटांनी सांगितलेले प्रयोजन आहे.यश मिळावे म्हणून कोणताही कलावंत साहित्याचे लेखन करत नाही.चांगली वस्तूनिर्मिती करणाऱ्या व्यक्तीला यशासाठी कुठेही जाण्याची गरज नसते. चांगल्या वस्तूचा बोलबाला तिच्या प्राकृतिक गुणधर्मामुळे प्राप्त होतो.अण्णाभाऊंनी लिहिलेले साहित्य वास्तव आहे. त्यांच्या आजुबाजुच्या माणसाचे जीवन त्यांनी साहित्यात प्रामाणिकपणे मांडले आहे.त्यामुळेच त्यांच्या साहित्याला लोकप्रियता मिळाली आहे, त्यांचे साहित्य

वाचकाला अस्वस्थ,अंतर्मुख आणि विचार करायला लावते. हे साहित्य सर्वसामान्य माणसांना आपले आहे, असे वाटणे हेच अण्णाभाऊंच्या साहित्याचे यश आहे असे मला वाटते.'फकिरा' कादंबरी, माझी मैना गावावर राहिली, ही लावणी ,स्टॉलिनग्राड आणि लेनिनग्राडचा पोवाडा, जग बदल घालूनी घाव या गीताने तसेच "ही प्रथ्वी शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून दीनदलित आणि श्रमिकांच्या तळहातावर तरलेली आहे हा सिध्दांत अण्णाभाऊंना एक कलावंत म्हणून यश मिळवून दिले.त्यांची लेखक म्हणून ख्याती जगभर पसरली हे खरे असले तरी, कोणत्याही लेखक मला साहित्य लेखनाने किर्ती, यश, लोकप्रियता मिळावी म्हणून साहित्य लेखन करत नाही यश हा हेतू डोळयासमोर ठेवून साहित्य लेखन केल्यास यश हमखास मिळेलच असे सांगता येत नाही. अण्णा भाऊ साठे यांनी आपणास साहित्य लेखनाने यश मिळावे म्हणून साहित्य लेखन केले नाही. अण्णाभाऊंना लेखक आणि माणूस म्हणून प्रतिष्ठा, सन्मान पाहिजे तसा मिळाला नाही. उपेक्षितांचे जीवन साहित्यातून मांडणार्या या कलावंताला समाज आणि साहित्य समीक्षेच्या क्षेत्रात उपेक्षितचं ठेवलं गेलं हे सत्य आहे.विषमतेच्या काळया चष्म्यातून समाज आणि समीक्षेकाला अण्णाभाऊ आणि त्यांचे साहित्य कसे चांगले दिसणार हा खरा प्रश्न आहे.अशा समाजाकडून लेखक यश,प्रतिष्ठा, सन्मान किर्तीची काय? ती अपेक्षा करणार?यश हे अण्णाभाऊंच्या साहित्यलेखनाचे प्रयोजन कसे काय असणार?सारांश साहित्यलेखनाने अण्णाभाऊंना यश मिळाले हे खरे असले तरी ते यशासाठी साहित्य लेखन करीत नव्हते हे नक्की सत्य होय.

**२)द्रव्य लोभ**ःअण्णाभाऊंनी द्रव्यलोभ हे मम्मटांनी सांगितलेले प्रयोजन डोळ्यासमोर ठेवून साहित्याचे लेखन आहे का?अशी उदाहरणे आपल्या डोळयासमोर अजिबात नाहीत, हे प्रयोजन डोळ्यासमोर ठेवून अण्णाभाऊंनी साहित्य लिहिले नाही. तसे असते तर अण्णा भाऊनी आपली लिहिलेली साहित्यक्रती दुसर्याच्या नावाने करून अमाप पैसे कमविले असते.आपले साहित्य, चित्रपट कथेसाठी देऊन ही भरमसाठ पैसा मिळवला असता. अण्णाभाऊंच्या साहित्यावर प्रकाशक,दिग्दर्शक आर्थिकद्रष्टया श्रीमंत झाले.पण ते आयुष्यभर आर्थिक विवेचंनेत राहिले.त्यांचे साहित्य, समाजाला सतत नैतिकतेचा प्रकाश देत राहिले पण त्यांचे जीवन काळोखमय दारिद्र्यात गेले ,तरी ही ते कलावीर म्हणून यशस्वी ठरलेले लेखक होतं.त्यांच्या फकिरा कादंबरीला महाराष्ट्र शासनाने एक हजार रूपयेचे पारितोषिक देऊन सन्मान केला,हे खरे असले तरी पैसा मिळावा म्हणून त्यांनी साहित्य लिहिले नाही. द्रव्य लोभ किंवा अर्थप्राप्ती हे अण्णा भाऊच्या साहित्य लेखनाचे प्रयोजन मानता येत नाही.

**३)व्यवहारज्ञान** ः व्यवहारज्ञान हे साहित्याचे प्रयोजन मम्मटांनी सांगितले आहे.साहित्यातून व्यवहाराचे ज्ञान मिळते का? तर त्याचे उत्तर होय, असे आहे.अण्णा भाऊंनी आपल्या

लेखनक्रतीपासून मानवी जीवनाचे दर्शन घडविले आहे.वेगवेगळ्या क्षेत्रातील आणि स्तरातील मानवी जीवन कसे आहे.परिस्थितीनिहाय माणसं कशी बदलतात याची माहिती त्यांचे साहित्य वाचून मिळते .त्यामुळे मानवाच्या अनुभवाच्या कक्षा रूदंत असतात.त्यामुळे वेगवेगळ्या क्षेत्रातील ज्ञान व्यक्तीला मिळते.त्यातून समाजात कुणाशी कसे वागावे हे कळते. समाज, व्यक्ति यांच्याशी कसे व्यवहार करावे हे व्यवहाराचे ज्ञान अण्णाभाऊंच्या साहित्यातून मिळते,अशी काही व्यवहारज्ञानाची उदाहरणे खालीलप्रमाणे आहेत

१)"कारण गरीब माणूस पोटासाठी वाटेल ते करतो.परंतु श्रीमंतीनं आपल्या श्रीमंतीच्या जोरावर शीलाचा सौदा करु पहाणं हा फार मोठा अपराध आहे"१

२)"दारिद्र्य हे फार क्रूर असते नि ते नग्न असते.त्यांच्या खुणा माणसाच्या मनावर,ह्रदयावर नि चेहऱ्यावर शुद्ध उमटलेल्या दिसतात "२

३)"परंतु केवडयाचं कणीस कोलमडलं तरी त्याचा सुगंध कोलमडत नसतो"३

४)"माझी कला मागा,तिचा आत्मा मागू नका.त्याची किंमत करता येणार नाही. किंमतीने विकला जाणारा आत्मा हा आत्माच नसतो"४

अशाप्रकारे अण्णाभाऊंच्या साहित्यातून व्यवहाराचे ज्ञान मिळत असले तरी त्यांना साहित्यातून व्यवहाराचे ज्ञान दयायचे नव्हते .ते त्यांच्या साहित्य लेखनाचे प्रयोजन नव्हते.हे त्यांचे साहित्य वाचल्यानंतर लक्षात येते.

**४)उपदेश** :: समाजाला काही तरी उपदेश करून शहाणे करावे. हा हेतू अण्णाभाऊनी डोळ्यासमोर ठेवून साहित्य लिहिले आहे असे म्हणता येते.त्याना समाजबदलासाठी बहुजन समाजातील माणसाचे मन आणि मनगट मजबूत करावयाचे होते.उपेक्षित समाजावर होणारा अन्याय अत्याचार कमी करण्यासाठी आपल्या साहित्यातून काही तरी उपदेश केल्याशिवाय क्रांतीसाठी ते तयार होत नाहीत. याची त्यांना जाणीव होती म्हणून त्यांनी शाहीरी वाङ्.मयातून समाजाला उपदेश करण्यासाठी लावणी,पोवाडे,लोकगीते लिहिले.त्यांना समाजप्रबोधन करून अन्याय, अत्याचार,शोषणाविरूध्द बंड करण्यासाठी त्यांचे दंड मजबूत करण्यासाठी क्रांतीगीतातून त्यांना उपदेश करावयाचे होते. त्यांच्यातील खुळचटपणा,अज्ञान, अंधश्रद्धा घालवून विवेकवादी,विज्ञानवादी समाज निर्माण करावयाचा होता.त्यांना उपदेशाचे डोस पाजल्याशिवाय समाज जागृत होत नाही याची पुरेपुर जाणीव त्यांना होती.म्हणून ते त्यांच्या साहित्यातून उपदेश करताना लिहितात. ,"आता वळू नका।रणि पळू नका। कुणी चळू नका। बिनि मारायची अजून राहिली। माझ्या जिवाची।।"५ अशाप्रकारचा उपदेश अण्णाभाऊ साहित्यातून करतात. ते जसे लेखक होते,तसा त्यांचा मूळ पिंड कार्यकर्त्याचा होता.कार्यकर्ता हा आपला विचार पटवून देण्यासाठी समाज

बदलासाठी उपदेशाचा डोस आपल्या साहित्यातून पाजत असतो. त्यासाठी कथनी आणि करणी करीत असतो.म्हणून उपदेश हे अण्णाभाऊंच्या साहित्याचे प्रयोजन आहे असे म्हणता येईल.

**५)सौंदर्यप्राप्ती** ःहे साहित्याचे प्रयोजन सर्वमान्य असे आहे.सौंदर्य हेच साहित्याचे एकमेव उद्दिष्ट असते.त्यासाठीच साहित्य जन्माला आलेले असते. दुःखितांना सुखी करण्याचे कार्य साहित्य करते.सौदर्यप्राप्ती हे वाचक आणि लेखक या दोघांच्या द्रष्टीने महत्त्वाचे असलेले प्रयोजन आहे. अण्णाभाऊंनी एकापेक्षा अनेक चांगल्या साहित्यक्रतीला जन्म दिला.त्यांचे साहित्य अनेक भाषेत अनुवादित झाले. लेखक म्हणून त्यांची ख्याती जगभर पसरली. त्यांच्या फकिरा कादंबरीला महाराष्ट्र शासनाचे पुरस्कार मिळाले. साहित्य लेखनामुळे त्यांना रशियाला जाता आले.त्यांच्या अनेक साहित्यावर चित्रपट निघाले.या सर्व घटना आणि प्रसंग अण्णाभाऊंना आनंद देणार्या होत्या. अण्णाभाऊंच्या साहित्याचे प्रयोजन आनंद हे होते हे लक्षात येते. वाचकाच्या द्रष्टीने अण्णाभाऊंच्या साहित्याचा विचार करताना फकिरा, माकडीचा माळ,अलगूज,वारणेचा वाघ, वारणेच्या खोर्यात अशा कादंबर्या असो की,खुळंवाडी, बरबाद्या कंजारी, क्रष्णाकाठच्या कथा, इ. कथासंग्रह किंवा माझा रशियाचा प्रवास ,इनामदार, नाटक, लावणी पोवाडे ,गीते वाचून अलौकिक दर्जाचा आनंद मिळत असतो.आनंद हे अण्णा भाऊंच्या साहित्याचे प्रयोजन वाचक आणि लेखक सापेक्ष आहे.आनंद म्हणजे सुख, समाधान होय.व्यक्तीच्या शरीरात जे स्थायीभाव असतात.त्यांना साहित्य वाचनाने किंवा लेखनाने उद्दपित केले की,रसाची निर्मिती होते.त्यातूनच मिळणारा आनंद म्हणजे सौदर्यानंद असतो. सौंदर्यानंद किंवा सौंदर्यप्राप्तीचा आनंद लेखक आणि वाचक यांना देण्याची क्षमता अण्णाभाऊंच्या साहित्यात आहे हे विशेष होय.

**६)आत्माविष्कार**ः हे साहित्याचे प्रयोजन पाश्चिमात्य अभ्यासकांनी सांगितले आहे. आत्माविष्कार म्हणजे आपल्या मनामध्ये जे साठलेले आहे. आपल्या मनाला जे वाटते ,ते दुसऱ्यांना सांगावे या उत्कटतेतून जे लिहिलेले असते या प्रक्रियेला आत्माविष्कार म्हटले जाते.अण्णाभाऊंचा आत्माविष्कार खालील काव्यपंक्तीतून व्यक्त झाला आहे. "धनवंतानी अखंड पिळले।धर्मांधांनी तसेच छळले। मगराने जणू माणिक गिळिले।चोर जाहले साव।६अशाप्रकारे अण्णाभाऊंचा आत्माविष्कार त्यांच्या साहित्यक्रतीतून आविष्कृत झाला आहे. येथील मनुजवैरी व्यवस्थेने उपेक्षित, वंचित बहुजनांना वर्ण आणि वर्ग व्यवस्थेच्या माध्यमातून गुलाम केले आहे. समाजात समता प्रस्थापित करण्यासाठी बहुजनांनी वर्ण आणि वर्ग व्यवस्थेविरुद्ध बंड केले पाहिजे हे अतिशय उत्कटत भावनेचा आविष्कार अण्णाभाऊंच्या साहित्यातून झाला आहे.अण्णाभाऊंनी आत्माविष्कारासाठी साहित्य लिहिले नसले ,तरी त्यांच्या साहित्यातून उपेक्षितांचे जीवन दर्शन त्यांच्या उत्कट आत्मविष्कारातून प्रसुत झाले आहे ,हे मान्य करावे लागते. कोणताही कलावंत साहित्यनिर्मिती

करताना एकच प्रयोजन डोळयासमोर ठेवून साहित्यनिर्मिती करीत नाही तर त्याच्या साहित्य निर्मितीच्या पाठीमागे अनेक प्रयोजनेअसतात. अण्णाभाऊंच्या साहित्याचे प्रयोजने अनेक आहेत त्यातील महत्त्वाचे प्रयोजन म्हणजे आत्माविष्कार हे होय.

**७)राष्ट्रोन्नती आणि समाजोध्दारः** अण्णाभाऊंचे साहित्य हे माणूस,समाज आणि राष्ट्राची उन्नती व्हावी या उदात्त भावनेने लिहिलेले साहित्य आहे.साहित्य लेखन करताना हा हेतू त्यांच्या डोळ्यासमोर होता.अण्णाभाऊंचे साहित्य स्त्रीचे शील ,पुरूषांचा पराक्रम,आणि देशाचा स्वाभिमान हा विचार म्हणजे समाजाचा उध्दार करणारा आहे.त्यांनी फकिरा, सावळा,विष्णूपंत कुलकर्णी अशा व्यक्तीरेखा साहित्यातून त्यांनी जीवंतपणे उभ्या केल्या आहेत तसेच राष्ट्राच्या उन्नतीसाठी बलिदान देणारी मंगला,हिंदूराव इ. व्यक्तीरेखा ही त्यांच्या साहित्यात पहावयास मिळतात. "डॉ. केतकरांनी राष्ट्रोन्नती,समाजोध्दार,उदात्त गुणाची जोपासना करणे हीच साहित्याची प्रयोजने मानली आहेत"७राष्ट्रोन्नती आणि समाजोध्दार करणे हे अण्णाभाऊंच्या साहित्य लेखनाचा हेतू होता हे पुढील उदाहरणावरून लक्षात येते.अण्णाभाऊ 'वैजयंता' कादंबरीच्या प्रस्तावनेत लिहितात,"जो कलावंत जनतेची कदर करतो त्याचीच कदर जनता करते,हे मी प्रथम शिकून नंतर लेखन करीत असतो.माझा माझ्या देशावर,जनतेवर नि तिच्या संघर्षावर अढळ विश्वास आहे.हा देश सुखी समृध्द व्हावा,इथे समता नांदावी, या महाराष्ट्र भूमीचे नंदनवन व्हावे अशी मला दररोज स्वप्ने पडत असतात.ती मंगल स्वप्ने पहात पहात मी लिहित असतो."८ उपरोक्त वैजयंता कादंबरीची प्रस्तावना वाचली की,हे लक्षात येते की, अण्णाभाऊंच्या साहित्य लेखनाचे प्रयोजन राष्ट्रोन्नती आणि समाजोध्दार हे होते अशा उदात्त अंतःकरणाने ते साहित्य लिहित होते.समाज राष्ट्राचे मंगल स्वप्न पाहात साहित्य लिहिणारा आवलिया स्वतः फकिर राहिला पण फकिराला अजरामर केला.समाजाचा उध्दार आणि राष्ट्राची उन्नती करण्यासाठी लावणी ,पोवाडे कथा कादंबरी लिहून मराठी साहित्याचा शिवार हिरवागार केला हे विशेष होय.

**८)जीवनानुभूती** ःअण्णाभाऊंच्या साहित्याचे प्रयोजन जीवनानुभूती हे सांगता येते.त्यांचे साहित्य कल्पनेतून जन्माला आले नाही तर वास्तवातून जन्माला आले आहे.आपल्या आजूबाजूच्या उपेक्षित,दारिद्र्यात पिचत पडलेल्या भूकेसाठी आक्रोश करणाऱ्या सामान्य माणसाचे जगणे त्यांनी प्रत्यक्षात पाहिली,अनुभवली आहेत. उपेक्षितांच्या वास्तव जीवनाला कलात्मकतेची जोड देऊन अक्षर साहित्य निर्मिती अण्णाभाऊंनी केली म्हणून जीवनानुभूती हे त्यांच्या साहित्य लेखनाचे प्रयोजन सांगता येते. याचे उत्तम उदाहरण म्हणून 'बरबाद्या कंजारी' या कथासंग्रहाची प्रस्तावना उपयुक्त ठरते.अण्णाभाऊ लिहितात,"माझी जीवनावर निष्ठा असून मला माणसं फार आवडतात. त्यांची श्रमशक्ती महान आहे. ती जगतात, जगाला जगवतात.त्यांच्या बळावरचं जग चालतं.त्यांची झुंज

नि त्याचं यश यावर माझा विश्वास आहे.त्यांना विद्रुप करणे मात्र मला आवडत नाही.नव्हे मला भीती वाटते. माणसांना वैफल्याच्या नावाखाली विद्रुप करु नये, असं माझं मत आहे. वैफल्य हे तलवारीच्या धुळीसारखं असतं.ती धूळ झटकून तलवार लखलखीत करता येते. मी जे जीवन जगतो,पाहातो,अनुभवतो तेच मी लिहितो.मला कल्पनेचे पंख लावून भरारी मारता येत नाही. त्या बाबतीत मी स्वतःला बेडूक समजतो.माझी सारी पात्रे या ना त्या नात्याने माझ्या आयुष्यात येऊन गेलेली आहेत. माझी माणसं ही वास्तव आहेत."९अण्णाभाऊचे साहित्य त्यातील व्यक्ती त्यांचे जीवन हेच अण्णाभाऊंना साहित्य लिहिण्यासाठी प्रेरणा देत होते.त्यांचे जीवन पाहून ते अस्वस्थ आणि अंतर्मुख करीत होते.अण्णाभाऊंच्या आजूबाजूचे जीवन,परिस्थिती त्यांच्या प्रतिभेला साहित्य लेखनासाठी चेतना आणि स्फूर्ती देत होते.अण्णाभाऊंनी जे जीवन जगलं अनुभव, पाहिलं तेच प्रामाणिक लिहिले आहे ते त्यांनी प्रामाणिकपणे नमूद केले आहे.सत्यजीवनानुभवाचे कलात्मक आविष्कार म्हणजे अण्णाभाऊंचे साहित्य आहे.सत्यजीवनानुभव साहित्यातून मांडणे हे अण्णाभाऊंच्या साहित्याचे प्रयोजन आहे, हे विशेष होय.

**९)सामाजिक बांधिलकी** ः अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य सामाजिक बांधिलकी मानणारे आहे. ज्या समाजात आपण जन्माला आलो त्या समाजाचे आपण देणे लागतो. त्यांच्याशी एकनिष्ठ राहून त्यांचे जीवन सहानुभूतीने आणि तितक्याच प्रमाणिकपणे मांडणे यालाच सामाजिक बांधिलकी असे म्हणतात यासाठी लेखकच स्वतःशी प्रमाणिक राहावावा लागतो तरच त्याच्या साहित्यातून वास्तव जीवनाचे चित्रण येत असते.अण्णाभाऊंच्या साहित्यातील जे समाज वास्तव आहे. त्या वास्तवाशी प्रमाणिक राहून अण्णाभाऊंनी साहित्य लिहिल्यामुळे ते सामाजिक बांधिलकी माननारे लेखक होते हे लक्षात येईल."व्यापक अर्थाने 'बांधिलकी' म्हणजे एखाद्या जीवनविषयक द्रष्टीकोनाचा जाणीवपर्वक स्वीकार करणे व आपण जे जे कार्य करीत असू,हाती घेऊ तेथे त्या जीवनविषयक द्रष्टीकोणाचा निष्ठेने पाठपुरावा करणे होय.व्यक्तीने एखाद्या जीवनविषयक द्रष्टीकोणाशी वचनबद्ध, प्रतिबध्द असणे,ती विशिष्ट गोष्ट आपले कर्तव्यच,जबाबदारीच आहे,ही जाणीव ठेवणे व त्यानुसार प्रत्यक्ष क्रती करणे या गोष्टी बांधिलकीच्या कल्पनेत अंतर्भूत आहेत."१०अण्णाभाऊ आपण ज्या समाजात जन्माला आलो त्या समाजातील उपेक्षित, वंचित, दुर्बल, विस्थापित समाजाचे जीवनदर्शन साहित्यातून मांडले. शेवटपर्यंत त्यांच्याशी बांधिलकी ठेवूनच साहित्य लिहिले. डॉ. गंगाधर पानतावणे विद्रोहाचे पाणी पेटले आहे या पुस्तकात लिहितात,"अण्णाभाऊ हाडाचे कम्युनिस्ट होते. मार्क्स त्यांनी वाचला होता.गोर्की पचवला होता. मराठीत उपलब्ध झालेले हे साहित्य त्यांनी सुक्ष्मपणे वाचले होते. कथा कादंबर्यात मार्कसवादाचा प्रभाव पडलेला नाही. शाहिरीतून मात्र ती प्रच्छन्नपणे दिसते.११"अण्णाभाऊंनी कथा कादंबर्यातून आंबेडकर आंबेडकरवादी विचार रूजविण्याचा

प्रयत्न केला तर शाहिरी वाङ्.मयातून मार्कसवादी विचारांशी एकनिष्ठ राहून तो विचार रूजविण्याचा प्रयत्न अण्णाभाऊंनी केला या उपरोक्त विवेचनावरून हे लक्षात येते की,ते सामाजिक बांधिलकी हा हेतू ड़ोळयासमोर ठेवून साहित्य लेखन करीत होते.त्यांनी मार्कसवाद आणि आंबेडकरी विचारधारेशी एकनिष्ठ राहून तोच विचार साहित्यातून मांडला.अण्णाभाऊंनी सामाजिक बांधिलकी हे प्रयोजन डोळयासमोर ठेवून साहित्य लेखन केले. सामाजिक बांधिलकी हे त्यांच्या साहित्याचे प्रयोजन आहे असे म्हणता येईल.

**१०)वास्तवानुभूती** ः हे अण्णा भाऊच्या साहित्यलेखनाचे प्रयोजन होते.अण्णाभाऊंच्या बरबाद्या कंजारी या कथासंग्रहातील बरबाद्या, सुलतान, भोमक्या, इरेनं गाढव खाल्लं या कथेतील तुका,आवडी कादंबरीतील आवडी,धनाजी, फकिरा कादंबरीतील सर्व पात्र वास्तव जीवनातील आहेत. काही व्यक्तीरेखा तर प्रत्यक्षात अण्णाभाऊंसोबत होत्या,वास्तवानुभूती हे त्यांच्या साहित्याचे प्रयोजन होते हे लक्षात येते.अण्णाभाऊ आवडी कादंबरीच्या प्रस्तावनेत लिहितात,"मी जे जीवन जगतं आहे,नि जे मी अनुभवलं आहे. तेच मी लिहितो.वास्तवतेला फाजील महत्त्व देणारा म्हणून काही मित्र माझ्यावर रागावतात पण मी त्यांचा राग मानीत नाही. नि आपला खाक्या बदलत नाही. वास्तवता आणि कल्पकता यांचा मेळ कसा घालावा हा एक प्रश्न माझ्यापुढं उभा असतो.माझी माणसं मला कुठं ना कुठं भेटलेली असतात. त्यांच जगणं मरणं मला ठाऊक असतं...आवडीचे प्रेत गोरीतून काढले तेव्हा मी गोरी जवळ हजर होतो.प्रचंड देहाचा धनाजी काखेत लुगडे चोळी घेऊन रडत होता. त्याला आवडीची एक चोळी मिळाली तेव्हा तो लहान मुलाप्रमाणे रडू लागला. त्या प्रसंगाचा माझ्या मनावर खोलवर परिणाम झाला. 'आवडी'चं जीवन माझ्या प्रतिभेत एकरूप झालं.तब्बल चार वर्षे मी विचार केला.सर्व पदर हाती आल्यानंतर मी ही'आवडी' निर्माण केली"१२उपरोक्त विवेचनावरुन हे लक्षात येते की,अण्णाभाऊंचे साहित्य वास्तव वादी आहे. त्यांनी जे पाहिलेले अनुभवलेले आहे तेच त्यांनी साहित्यातून मांडले आहे. आपल्या अनुभवाशी, आपल्या माणसांशी ,प्रामाणिक राहून त्यांचे जीवनदर्शन आस्थेने त्यांनी साहित्यातून मांडले आहे. सत्यदर्शन किंवा वास्तवानुभूती हेच त्यांच्या साहित्याचे प्रयोजन होते असे म्हणता येईल.

**११)प्रबोधन** ःअण्णाभाऊनी जे पोवाडे, लावणी,लोकगीते लिहिले ते शुद्ध लोकप्रबोधन करण्याच्या हेतूने होते.'लालबावटा' कलापथकाच्या माध्यमातून त्यांनी मार्कसवादी विचाराचा प्रचार आणि प्रसार करण्यासाच्या हेतूनी शाहिरी लिहिली आहे.त्यांच्या 'अकलेची गोष्ट' या लोकनाटयाच्या सुरुवातीला लिहितात,

" खानदेशामधी गाव राजुरी खेडे एक लहान।
त्या गावाची गोष्ट सांगतो घ्यावी ऐकून।।१।।

एक सावकार, दुसरा गवळी असे दोघेजण
मित्र जिवाभावाचे नांदत होते आनंदात।।२।।
करती काळाबाजार दोघांचे नफ्यावर ध्यान
स्वार्थासाठी शेतकऱ्यांची मुरगळती मान।।३।।

१३'अशाप्रकारे अण्णाभाऊंनी आपल्या शाहिरी वाङ्. मयातून, लोकनाट्यातून भांडवलदार कसे शेतकर्यांना लुबाडतात,त्यांचे शोषण कसे करतात याची जाणीव ते लोकनाटयातून करून देत असे.संयुक्त महाराष्ट्र चळवळीत ही मुंबई महाराष्ट्राला मिळाली पाहिजे यासाठी शाहिरीतून लोकप्रबोधन करून समाजाचे मन आणि मनगट चळवळ करण्यासाठी तयार करण्याचे काम अण्णाभाऊंनी त्यांच्या शाहिरी वाङ्.मयातून केले . समाजप्रबोधन करणे हा साहित्यलेखनाचा त्यांचा हेतू होता हे आपणाला मान्य करावे लागते. काही समीक्षकांनी अण्णाभाऊंचे साहित्य रंजनप्रधान आहे असे म्हणतात परंतु लोकमानसांचे मनोरंजन करीत त्यांच्या डोळ्यात प्रबोधनाचे अंजन घालण्याचे कार्य ते शाहिरी वाङ्.मयातून करीत होते हे मात्र नक्की खरे होते.

**समारोप** ः:साहित्याचे प्रयोजन एक की, अनेक अशी चर्चा साहित्यसमीक्षेच्या क्षेत्रात निरंतर चालू आहे.व्यक्ती तितक्या प्रव्रती प्रमाणे प्रत्येकाला जे प्रयोजन महत्त्वाचे आहे ते मांडण्याचा प्रयत्न केला गेला आहे. प्राचीनकाळी मम्मटांनी सांगीतलेली प्रयोजने २१व्या शतकात ही प्रमाणभूत मानून साहित्य प्रयोजनाचा अभ्यास केला जातो याचे कारण त्यांनी सांगितलेल्या प्रयोजनापैकी अशुभनिवारण हे प्रयोजन कालबाह्य झाले असले तरी तरी इतर प्रयोजनांचे महत्त्व वर्तमानकाळात तितकेच आहे.पाश्चिमात्य अभ्यासकांनी पलायनवाद,इच्छापुर्ती, स्वप्नरंजन, आत्मविष्कार, उदबोधन, प्रचार जिज्ञासाव्रती अशी काही प्रयोजने सांगितले आहेत.सत्य,शिव,सौंदर्य या प्रयोजनाला साहित्याच्या क्षेत्रात विशेष असे महत्त्व असते म्हणून कुसुमावती देशपांडे यांनीही अनेकनिकषांचा स्वीकार केला आहे.त्यांच्या मते सत्य,शिव,व सौंदर्य ही जीवनाची त्रिगुणात्मक अंगे आहेत. ती जीवनसापेक्ष आहेत."१४सत्य,शिव,आणि सौंदर्य या प्रयोजनाचा प्रत्यय अण्णाभाऊंच्या साहित्यात ही येतो.नैतिक उपदेश करणे, समाज सुधारणा करणे,समाजाबद्दल सिद्धांत मांडणे हे साहित्याचे प्रयोजन नव्हे परंतु साहित्यातून कलावंत विशिष्ट भावसत्य सांगत असतो, त्या भावसत्याच्या प्रतीतीपासून व सौंदर्यापासून होणारा आनंद वाचकाला देणे,सौंदर्यप्रतीतीने वाचकाचे अनुभूतीविश्व समृध्द करणे,त्याची जाणीव प्रगल्भ करणे हा साहित्याचा हेतू असतो,हा हेतु अण्णा भाऊंच्या साहित्यानी निश्चित साध्य केला आहे.

***संधर्भसूची :***

१)अण्णा भाऊ साठे - रूपा विद्यार्थी पब्लीकेशन,शुक्रवार पेठ पुणे,प्रष्ठ२३

२)अण्णा भाऊ साठे माझा रशियाचा प्रवास -सुरेश एजन्सी पुणे आव्रती प्रष्ठ ३५

३)अण्णा भाऊ साठे-आबी-भगवानदास हिराजी प्रकाशन खाडीलकर रोड,गिरगाव, मुंबई आव्रती दुसरी १९८६ प्रष्ठ ३३

४)अण्णा भाऊ साठे -क्रष्णाकाठच्या कथा मँजेस्टीक प्रकाशन मुंबई४आव्रती दुसरी प्रषठ-७९/८०

५) साहित्य जागर -भाग२ संपादक-डॉ. मा .मा.जाधव- अण्णा भाऊ साठे माझी मैना गावावर राहिली -कैलास पब्लीकेशन औरंगाबाद प्रथम आव्रती जुलै २००९प्रष्ठ १७१

६)मध्ययुगीन व आधुनिक कविता संपा,डॉ मा.मा.जाधव-अण्णा भाऊ साठे- जग बदल घालुनी घाव -कैलास पब्लीकेशन औरंगाबाद प्रथमाव्रती जून २००८प्रष्ठ१३८

७)वसंत पाटणकर -साहित्यशास्त्रः स्वरूप आणि समस्या-पद्मगंधा प्रकाशन पुणे आव्रती तिसरी सप्टेंबर २०१५प्रष्ठ ४३

८) अण्णा भाऊ साठे वैजयंता कादंबरीची प्रस्तावना मँजेस्टीक प्रकाशन,३१६,प्रसाद चेंबर्स, गिरगाव मुंबई आव्रती चौथी १९८८

९)अण्णा भाऊ साठे-बरबाद्या कंजारी, विद्यार्थी प्रकाशन पुणे ९नवीन आव्रती२००४(प्रस्तावना)

१०)वसंत पाटणकर साहित्यशास्त्रःस्वरुप आणि समस्या-पद्मगंधा प्रकाशन पुणे तिसरी आव्रती सप्टेंबर२०१५प्रष्ठ ४५ ११)डॉ. गंगाधर पानतावणे विद्रोहाचे पाणी पेटले आहे

१२)अण्णा भाऊ साठे आवडी(प्रस्तावना)सातवी आव्रती ऑगस्ट २००४सुरेश एजन्सी पुणे

१३)महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वाङ्.मय-३री आव्रती नोव्हेंबर २००६प्रष्ठ ११५'

१४)वसंत पाटणकर साहित्यशास्त्रः स्वरूप आणि समस्या-पद्दमगंधा प्रकाशन पुणे आव्रती तिसरी २०१५प्रष्ठ४३